

# K.K. Wagh Education Society



Central Office: Hirabai Haridas Vidyanagari, Amrutdham, Panchavati, Nashik-03.
Ph. No. (0253) 2221109, 2221111, 2221120
Email Id: disp-co@kkwagh.edu.in | Website : www.kkwagh.edu.in



## वैशिष्ट्ये

- गेली ५० वर्षे गुणवत्तापुर्ण शिक्षण प्रदान करणारी संस्था. के.जी. पासून पी. एच. डी. पर्यंत विविध शाखांमध्ये शिक्षणाची सोय उपलब्ध.
- अभियांत्रिकी महाविद्यालयातील सात (७) शाखांना व तंत्रनिकेतनच्या चार (४) शाखांना NBA कडून मानांकन प्राप्त.
- अभियांत्रिकी महाविद्यालयास NAAC द्वारा 'अ' श्रेणी प्राप्त.
- सन २०२२-२३ पासुन विद्यापीठ अनुदान आयोग (UGC) नवी दिल्ली कडुन अभियांत्रिकी महाविद्यालयास स्वायत्त दर्जा (Autonomous Status) मिळाला असून NEP 2020 च्या शिफारसींनुसार अभ्यासक्रमाची रचना.
- रोजगार व उच्च शिक्षणाच्या उत्तम संधी उपलब्ध करून देणारी संस्था.
- शिक्षण संस्थेचा औद्योगिक आस्थापनांशी असलेल्या सामंजस्यावर आधारित राष्ट्रीय स्तरावरील AICTE-CII सर्व्हेक्षणाद्वारे अभियांत्रिकी महाविद्यालय व तंत्रनिकेतनास ४ वेळा 'Platinum Category' (सर्वोत्कृष्ट दर्जा) प्राप्त.
- सहा विविध विद्याशाखांमध्ये कृषी शिक्षण प्रदान करणारी महाराष्ट्रातील सर्वात मोठी संस्था.
- अभिजात भारतीय कला जोपासणारी 'ललितकला व प्रयोगजिवी कला शिक्षण' महाविद्यालये.
- विद्यार्थी विकास केन्द्रीत शिक्षणावर भर देणारी संस्था.
- AICTE - Idea Lab साठी अनुदान मिळवणारे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील एकमेव अभियांत्रिकी महाविद्यालय.

**Following new programs have started recently :**

- **Artificial Intelligence & Data Science (Under Engineering)**
- **Robotics & Automation (Under Engineering)**
- **Computer Science & Design (Under Engineering)**
- **Artificial Intelligence & Machine Learning in Polytechnic**
- **Diploma in Pharmacy in Degree Pharmacy Institute**
- **BVA (Painting & Sculpture) in Fine Arts College**

## Constituents of K. K. Wagh Education Society

Engineering | Agriculture | Pharmacy | Polytechnic | MBA

MCA | Fine & Performing Arts | CBSE & SSC Schools

College of Arts, Commerce, Science & Computer Science

**!! HAPPY ENGINEERS DAY !!**

# ३ हजार विद्यार्थ्यांनी साकारले इको फ्रेंडली बाप्पा

आपलं महानगर वृत्तसेवा

के. के. वाघ शिक्षण संस्था नाशिक आणि स्मार्ट मॅनेजमेंट इंटरफेस लोकल एक्सचेंज (स्माईल) व स्पिनॅच सेंटर ऑफ एक्सलन्स यांचे संयुक्त विद्यमाने संस्थेच्या अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्रांगणात रविवारी (दि.३ ) इको फ्रेंडली गणेशा कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होत्. कार्यशाळेचे यंदाचे हे पाचवे वर्ष होते. कार्यशाळेत जिल्ह्यातील विविध शाळेच्या तीन हजारहून अधिक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेत गणेशमूर्ती साकारल्या. अनेक विद्यार्थी शाडू मातीपासून साकारलेल्या बाप्पाची घरी प्राणप्रतिष्ठापना करणार आहेत.

या कार्यशाळेचे उदघाटन ज्येष्ठ पत्रकार मिलिंद कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे विश्वस्त शकुंतला वाघ, स्माईल व स्पिनॅचे सचिव अजिंक्य वाघ व अवंतिका वाघ उपस्थित होते.



## के. के. वाघ शिक्षण संस्थेतर्फे इको फ्रेंडली कार्यशाळेचे आयोजन

विश्वस्त शकुंतला वाघ म्हणाल्या की, विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देत. विद्यार्थ्यांना सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून पर्यावरण संवर्धनाचे कार्यही संस्थेच्या वतीने केले जाते.

अजिंक्य वाघ म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा, यासाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी विद्यार्थ्यांनी शाडू मातीपासून तयार केलेल्या गणेशमूर्तींची प्राणप्रतिष्ठापना करावी, या हेतूने हा उपक्रम राबविला जातो. इको फ्रेंडली गणेशा कार्यशाळेस शहरी भागासह ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात कार्यशाळेत सहभाग घेत, शाडू माती पासून सुबक, सुरेख व देखण्या गणेशमूर्ती साकारलेल्या मूर्ती बघून संस्कृती, संस्कार साध्य होतांना पाहून मनस्वी आनंद होत असल्याचे ज्येष्ठ पत्रकार मिलिंद कुलकर्णी यांनी सांगितले. के. के. वाघ ललित कला महाविद्यालयाचे शिक्षक व मूर्तीकार यांनी विद्यार्थ्यांना शाडू मातीपासून गणेशमूर्ती साकरण्याबाबत मार्गदर्शन केले. सारंग नाईक यांनी सूत्रसंचालन केले. कार्यशाळा यशस्वितेसाठी प्राचार्य, शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# 'स्वप्नपूर्ती' तर्फे २२२ स्वयंसेवकांचा सन्मान



स्वप्नपूर्ती संस्थेच्या कार्यक्रमात उपस्थित असलेले सत्कारार्थी. सोबत मान्यवर अतिथी व संस्थेचे पदाधिकारी

**प्रतिनिधी** | नाशिक

स्वप्नपूर्ती सामाजिक संस्थेतर्फे क. का. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयात समाजसेवेचा वसा हाती घेतलेल्या २२२ स्वयंसेवकांचा प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. शैक्षणिक अधिष्ठाता डॉ. प्रा. सुनील कुटे प्रमुख पाहुणे होते.

'समाजात असंख्य प्रकारच्या समस्या आहेत, या समस्या लक्षात घेऊन त्यावर उपाय योजनात्मक प्रकल्प अभियांत्रिकी शिक्षण घेणाऱ्या सर्व स्वयंसेवकांनी तयार करावे, असे आवाहन प्रा.कुटे यांनी केले. सर्वांनी अजून जोमाने सामाजिक कार्य करत राहावे, असे आवाहन स्वप्नपूर्तीच्या सचिव- मा. रिना काकडे पाटील यांनी केले. संस्थापक- अध्यक्ष प्रा.सचिन काकडे यांनी मनोगत व्यक्त केले. साक्षी गरगटे आणि अस्मिता पठाडे यांनी सूत्रसंचालन केले. सिद्धेश खराडे, युगांत नंदरे, मिहिर इंगळे यांचे सहकार्य लाभले.

Divya marathi 04-09-2023